शिक्षक परिषद संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. ०९/१०/२०१९

अ.क.	सर्वसाधारण विषय	करावयाच्या कार्यवाहीचा तपशील	कार्यवाही कोणत्या स्तरावर	कालावधी
१	मागिल सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.	मागिल सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.	--	--
२	मागील सहविचार सभेत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.	मागील सहविचार सभेत झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यात आला.	--	--
३	शासनाने सन १९८१ च्या सेवाशर्ती व विविध शासन निर्णयान्वये सर्व संवर्गातील शिक्षक शिक्षकेत्तर यांना संस्था कार्यालय व मा. मुख्याध्यापक कार्यालयाने खालील बाबी पुरवणे बंधनकारक केले असतानाही हि दोन्ही कार्यालये (काही सन्माननीय अपवाद वजा करता) सरासपणे टाळाटाळ करतात त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर यांच्या सेवासंरक्षणास गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होतो यासाठी :-.	संस्था/शाळा मुख्याध्यापकांच्याकडून शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नेमणूक आदेशाची प्रत, वैयक्तिक मान्यता आदेशाची प्रत, सेवा दाखले, व सेवाज्येष्ठता यादी इ. अशा अनेक प्रकारच्या सेवाविषय कागदपत्रे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे नियुक्ती होवून बराच कालावधी होवूनही त्यांचे सेवापुस्तक अद्यापपर्यंत तयार केले गेले नसल्याबाबत संघटना प्रतिनिधीकडून सांगण्यात आले. सर्व शिक्षणाधिकारी यांनी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मूळ सेवापुस्तक, सेवाज्येष्ठता यादी तसेच दुबार सेवापुस्तक व इतर अनुषंगीक सेवाविषयक बाबींची कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होईल याबाबतचे नियोजन करावे. याबाबत शिक्षणाधिकारी यांनी सर्व शाळा मुख्याध्यापक यांना परिपत्रकान्वये याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात. शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना दरमहा वेतन देयके स्विकारताना उपरोक्त कार्यवाहीबाबत काय प्रगती झाली याबाबत दरमहा नियमित आढावा घेणेबाबतच्या सूचना द्याव्यात. उपरोक्त कार्यवाही दि. ३१ मे २०२० अखेर पूर्ण होण्यासाठी संघटनेनेदेखील शिक्षणाधिकारी तसेच अधीक्षक, वेतन पथक यांचेसोबत समन्वय साधून उपरोक्त कार्यवाही यशस्विरित्या पार पाडण्याबाबत सहकार्य करावे.	शिक्षणाधिकरी /वेतन पथक स्तरावर	--
	अ) प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना परिपूर्ण भरलेली सेवापुस्तकाची दुय्यम प्रत देणे व वेळच्या वेळी सर्व नोंदी कराव्यात.			
	ब) प्रत्येक सेवकास खालील कागदपत्रे (मुळ स्वरुपात किंवा साक्षांकित प्रतीच्या स्वरुपात) मिळावीत			
	१) नेमणूक आदेशाची सत्य प्रत			
	२) वैयक्तिक मान्यतेची प्रत			
	३) वरिष्ठ व निवडश्रेणी मान्यतेची प्रत			
	४) पदोन्नती मान्यता प्रत			
	५) बदली मान्यता प्रती			
	६) सेवा दाखला			
	७) सेवाज्येष्टता यादीची दर वर्षीची प्रत			
	८) विविध प्रशिक्षण विषयक कागदपत्रे			
	९) विविध रजामंजूरीच्या ठरावांच्या प्रती			
	१०) मासिक वेतन चिठ्ठी (पे स्लीप) इ.			
४	दिनांक ०१/१०/२०१९ रोजी मा. शिक्षण उपसंचालक	सर्व शिक्षणाधिकारी यांनी दि. २६/०८/२०१९ रोजीच्या शासन	शिक्षणाधिकारी स्तरावर	--

	कोल्हापूर यांनी वरिष्ठ व निवड श्रेणी संदर्भात दिलेल्या मा. शिक्षणाधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा आढावा.	निर्णयान्वये शिक्षकांकरिता वरिष्ठ/निवड श्रेणी निवड श्रेणी साठी लागू केलेल्या सुधारित तरतुदीनुसार कार्यवाही करावी. तसेच सदरहू प्रक्रिया राबविताना शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावर संघटना प्रतिनिधीसोबत बैठक घेवून चर्चा करुन नियोजन करावे.		
५	सन २०१८-१९ अखेरच्या पी.एफ. स्लिपा वितरण बाबत तसेच डी.सी.पी.एस. स्लिपा वितरणाबाबत.	शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. कोल्हापूर यांनी सन २०१८-१९ या वर्षिच्या ४ तालुक्यांमध्ये स्लिपांचे वाटप झाले असल्याबाबत सांगितले तसेच उर्वरित तालुक्यांमधील स्लिपांचे वितरणाची कार्यवाही माहे नोव्हेंबर-२०१९ अखेर पूर्ण करणार असल्याचे सांगितले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सांगली कार्यालयाकडून सन २०१२ पासून पी.एफ. स्लिपांचे वितरण झाले नसल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सांगली यांनी याबाबत शिबीराचे आयोजन करुन लवकरात लवकर स्लिपांचे वितरण पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे नमूद केले. भ.नि.नि. स्लिपाबाबत सर्व अधीक्षक, वेतन पथक यांनी लेखे पूर्ण करुन स्लिपांच्या वितरणाची कार्यवाही पूर्ण करावी. शिक्षणाधिकारी यांनी तशा सूचना अधीक्षक, वेतन पथक यांना द्याव्यात. तसेच याबाबत जिल्हा संघटनेकडून त्या-त्या शिक्षणाधिकारी तसेच अधीक्षक, वेतन पथक कार्यालयांना उपरोक्त कार्यवाही पूर्ण करण्याबाबत वेळोवेळी सहकार्य करावे.	शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर	--
६	वैद्यकिय प्रतिपूर्ती सेवानिवृत्ती प्रस्ताव पी.एफ परतावा/विनापरतावा अग्रीम इ. वेळेत मिळणेबाबत	कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीबाबतचे सर्व लाभ हे कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दिवशी मिळणे अपेक्षीत आहे. यासाठी सदरहू कर्मचारी सेवानिवृत्त होण्याच्या सहा महिन्याआधी सेवानिवृत्ती प्रस्ताव अधीक्षक, वेतन पथक कार्यालयात येणे अपेक्षीत आहे. याबाबत अधीक्षक, वेतन पथक यांनी शाळेकडून वेतन देयके स्विकारताना त्या-त्या वर्षी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी शाळेकडून उपलब्ध करुन घ्यावी. त्याप्रमाणे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत सहा महिनी आधी सेवानिवृत्तीबाबत प्रस्ताव शाळेस सादर करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात. जेणेकरुन	शिक्षणाधिकारी/ वेतप पथक स्तरावर	--

		सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीचे लाभ हे वेळेत मिळातील.		
७	शालार्थ आयडी प्रस्तावाबाबत	शालार्थ आयडी च्या प्रस्ताव निकाली काढण्याबाबत सद्या कार्यवाही सुरु आहे. विधानसभा निवडणूकीमुळे अधिकारी वर्ग हा व्यस्त असल्यामुळे शालार्थ च्या छाननी समितीची बैठक आयोजित करता आली नाही. विधानसभा निवडणुकांचे कामकाज पूर्ण होताच शालार्थ छाननी समितीची बैठक आयोजित करुन प्रलंबित प्रस्तावांना शालार्थ आयडी देण्याचे कार्यवाही करण्यात येईल.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
८	अर्धवेळ शिक्षक मान्यता बाबत (सिंधुदुर्ग जिल्हा)	अर्धवेळ मान्यतेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले. अर्धवेळ शिक्षक मान्यतेच्या प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.सिंधुदुर्ग.	शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सिंधुदुर्ग	--
९	उच्च माध्यमिक शिक्षक मान्यता बाबत	उच्च माध्यमिक शिक्षक मान्यताबाबत कार्यवाही सुरु आहे.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
१०	२००५ पूर्वी मान्यता असणारे अर्धवेळ शिक्षकांच्या पी.एफ. कपातीबाबत	अर्धवेळ कर्मचारी हा स्थायी कर्मचारी नसल्यामुळे त्यांचे पी.एफ. कपात होऊ शकत नाही.	--	--
११	दीपावली सुट्टी २३ किंवा २४ ऑक्टोबर पासून लागू करणेबाबत महाराष्ट्र विधान सभा निवडणूक दिनांक २१ रोजी आहे. दिनांक २१ रोजी रात्री उशिरा व काही वेळेस २२ तारखेस सकाळ पर्यंत कामकाज चालते म्हणून दीपावली सुट्टी २३ किंवा २४ ऑक्टोबर पासून लागू करणेबाबत कार्यवाही व्हावी.	एकूण सुट्टयांची ७६ पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घेवून जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी आणि जिल्हा संघटना यांनी जिल्हास्तरावर बैठक घेवून नियोजन करावे.	शिक्षणाधिकारी / संघटना स्तरावर	--
१२	राज्याच्या धोरणात्मक निर्णयानुसार मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन दर महिन्याच्य १ तारखेस होणेबाबत कार्यवाही व्हावी.	शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ तारखेस न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या गृहकर्जावर नाहक जास्त व्याज/दंड भरावा लागतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ तारखेस होणेबाबत संघटनेकडून मागणी करण्यात आली. सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा १ तारखेस होणेबाबत सूचना निर्गमित कराव्यात.	शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर	--
१३	१ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत मुख्याध्यापक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे	धोरणात्मक बाब असल्यामुळे राज्यस्तरीय होणाऱ्या संघटना बैठकीमध्ये चर्चा करावी.	--	--

	प्रलंबित प्रश्न			
	अ) पी.एफ. स्लिपा मिळणेबाबत			
	ब) सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या लाभाबाबत मार्गदर्शन व्हावे.			
	क) सहाव्या वेतन आयोगानुसार सदर शाळेतील कर्मचारी यांचे पाच हाफ्त्यापैकी थकीत हफ्ते जमा करणेबाबत.			
१४	दीपावली निमित्त ऑक्टोबरचे वेतन दिनांक २१ ऑक्टोबर पूर्वी होणे संदर्भात कार्यवाही व्हावी.	सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित कराव्यात.	शिक्षणाधिकारी/वेतन पथक स्तरवर	--
१५	**आयत्या वेळचे विषय**			
१	वेतनपडताळणी होणेबाबत तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीबाबत	लेखाधिकारी यांचेकडून विभागामध्ये वेतन पडताळणी होत नसल्याबाबत सांगण्यात आले. विशेषतः लेखाधिकारी, सांगली यांचे कार्यपध्दतीबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असल्याबाबत संघटनेकडून सांगण्यात आले. लेखाधिकारी यांचेकडील प्रलबिंत असणाऱ्या विषयांबाबत सर्व लेखाधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करुन त्यांना त्यांचेकडील प्रलंबित असलेल्या विषयांबाबत योग्य त्या सूचना निर्गमित करण्यात येणार आहेत.	शिक्षण उपसंचालक स्तरावर	--
२	वैयक्तिक मान्यता शिबीराचे आयोजन	सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि.०६/०२/२०१२ प्रमाणे वैयक्तिक मान्यतेच्या शिबीराचे आयोजन करावे.	शिक्षणाधिकारी स्तरावर	--
३	उच्च माध्यमिक ३३४ व्यपगत पदांबाबत माहिती मिळणेबाबत.	दि. ०९ एप्रिल २०१८ च्या शासन निर्णयान्वये कोल्हापूर विभागातील १३० पदे व्यपगत करण्यात आली. १३० पदांपैकी पुणेवेळ ८१ व अर्धवेळ ४९ पदे आहेत. ८१ पूर्णवेळ पदांपैकी १४ पूर्णवेळ पदे पुनर्जिवित करण्यात आली आहेत.	--	--
४	शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेबाबत झालेल्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत	मा. उच्च न्यायालयाकडून काही शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतचे निर्णय देण्यात आलेले आहेत. याबाबत काय कार्यवाही झाली? अशी संघटनेकडून विचारणा करण्यात आली. मा. उच्च न्यायालय यांचेकडून शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत निर्णय झाले असले तरी तो निर्णय जर शासन धोरणाविरुध्द असेल तर त्या निर्णयाविरुध्द	--	--

		संबधित शिक्षणाधिकारी यांनी रिव्ह्यू पिटीशन दाखल करण्याबाबतच्या सूचना शासन स्तरावरुन असल्यामुळे अशा दाखल होणाऱ्या रिव्ह्यू पिटीशन वरील होणाऱ्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.		
५	चेकलिस्ट तयार करणेबाबत	शाळांकडून शिक्षणाधिकारी कार्यालयामध्ये दाखल करण्यात येणाऱ्या बऱ्याच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध सेवाविषयक प्रस्ताव त्रुटी असल्यामुळे बराच काळ प्रलंबित राहतात. संपूर्ण विभागामध्ये एकसुत्रता येण्याकरिता विभागस्तरावर शिक्षणाधिकारी कार्यालयात दाखल करण्यात येणाऱ्या विविध सेवाविषयक प्रस्तावांसोबत कोणकोणती कागदपत्रे असावीत याबाबत हस्तपुस्तीका तयार करण्यात यावी अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. विभागस्तरावर अशाप्रकारची चेकलिस्ट तयार करण्यात आलेली आहे व ती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द देखील करण्यात आली आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी व जिल्हा संघटनेचे प्रतिनिधी यांनी एकत्र येवून पुनश्चः नव्याने एक हस्तपुस्तिका तयार करावी व ती विभागाच्या संकेतस्थळवर प्रसिध्द करण्यात यावी. सदरहू कार्यवाही माहे-नोव्हेंबर अखेर पूर्ण करण्यात यावी.	शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी / संघटना स्तरावर	--
६	शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनुकंपा भरतीबाबत	मयत कर्मचाऱ्याचा अनुकंपाधारक उमेदवार जर शिक्षकाची शैक्षणिक पात्रता धारण करत असेल तर दि. २०/०१/२०१६ च्या शासन निर्णयाप्रमाणे शिक्षक म्हणून नियुक्ती करता येईल. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनुकंपा नियुक्तीबाबत शासन निर्णय दि. १०/०६/२०१० अन्वये शिक्षकेतर कर्मचारी हा जर नोव्हेंबर २००५ पूर्वी मयत झालेला असेल तर त्या प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देता येईल. परंतु, दि. २५/११/२००५ नंतर शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत आजअखेर निर्णय झालेला नाही. त्यामुळे शाळेमध्ये शिक्षकेतर पदे किती मंजूर आहेत याबाबतची माहिती उपलब्ध नसल्यामुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करता येणार नाही.	--	--
७	दि. २१/०५/२०१६ ते ३१/०५/२०१९ अखेर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या देय असलेल्या फरकाच्या व्याजाच्या रकमेबाबत	दि. २१/०५/२०१६ ते ३१/०५/२०१९ अखेर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या देय असलेल्या फरकाच्या व्याजाची रक्कम अनुदान प्राप्त होताच संबंधीतांना वितरित करण्यात येईल.	शिक्षणाधिकारी /वेतन पथक स्तरावर	--

➢	**सर्वसाधारण सूचना**			
	संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे.	सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल.	संघटना स्तरावर	--

(सत्यवान सोनवणे)
शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर